सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

Ph. :0253-2230580, http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

नोंदणी कक्ष

जा.क्र. : नोंदणी/२०२२/41 दिनांक : १४/०२/२०२२

सूचनापत्र क्र. ३१

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी विविध शिक्षणक्रमाचे ऑनलाईन प्रवेश दिनांक १ जुलै २०२१ पासून सुरु झाले होते. संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर सुरु असलेल्या कोरोना (कोव्हीड १९) या विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर व महाराष्ट्रात झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे असंख्य विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहीलेले होते. या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये या सामाजिक बाधंलकीच्या जाणीवेतून शिक्षणक्रमाच्या एकुण शुल्कापैकी विद्यापीठाचा हिस्सा दोन टप्प्यात भरण्याची विशेष सोय विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेली होती. या सवलतीत ऑनलाईन प्रवेशअर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी **दिनांक ३१ मार्च २०२२** पर्यंत दुसऱ्या टप्प्याचे शुल्क भरून आपला प्रवेश कायम करावा.

प्रवेश शुल्काचा दुसरा हप्ता भरण्यासाठी खालीलप्रमाणे कृती करावी

१) https://ycmou.digitaluniversity.ac/ या विद्यापीठ पोर्टलच्या होमपेजवर जावे.

२) होमपेजवरील उजव्या बाजूस असणाऱ्या "Click Here for Admission" या विंडोवर क्लिक करावे.

३) त्यानंतर येणाऱ्या पेजवरील खालील मजकुरावर क्लिक करावे.

Click Here for Online Application to Various Programs of Academic Year २०२१-२२.(शैक्षणिक वर्ष 2021-22 च्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा)

४) ज्या विद्यार्थ्याचा कायम नोंदणी क्रमांक २०२१०१७ या अंकाने सुरु होतो अशा विद्यार्थ्यांनी त्यांचा D२१EJ ने सुरु होणारा युजरनेम आणि पासवर्डने लॉगीन करून शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता ऑनलाईन पद्धतीनेच भरावयाचा आहे.

५) कायम नोंदणी क्रमांक २०२१०१७ या व्यतिरिक्तच्या अंकांनी (उदा. २०२००१७, २०१९०१७, ई.) सुरु होणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचा कायम नोंदणी क्रमांक हाच त्यांचा युजरनेम आणि पासवर्ड (नोंदणीकृत जन्मदिनांक yymmdd या format मधील) किवा पासवर्ड रिसेट केला असेल तर त्या पासवर्डने लॉगीन करून शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता ऑनलाईन पद्धतीनेच भरावयाचा आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी टप्प्याने शुल्क भरण्याचा पर्याय निवडून Provisional प्रवेश घेतलेला आहे त्या विद्यार्थ्यांनी ३१ मार्च २०२२ पुर्वी दुसऱ्या टप्प्याचे शुल्क भरणे अनिवार्य आहे. दोन्ही टप्प्याचे शुल्क भरल्यानंतरच अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात येतील.

Vandana

(श्रीमती. वंदना झेंडे)
सहायक कुलसचिव,
नोंदणी कक्ष.

(डॉ. प्रकाश देशमुख)
संचालक,
विद्यार्थी सेवा विभाग.